# महिला सक्षमीकरण

स्नेहल सुजीत घोरपडे

---

**प्रस्तावना**:

महिला सशक्तीकरण म्हणजे महिलांना स्वतःच्या अस्तित्वांची जाणीव करून देणे त्यांच्यामधील असणाऱ्या कला गुणांना वाव देऊन, महिलांच्या प्रगतीसाठी त्यांना विविध क्षेत्रात विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे. म्हणजे महिला सक्षमीकरण होय

भारतीय शासनाने 2009 हे वर्ष राष्ट्रीय पातळीवरचे धोरण म्हणून स्त्रियांच्या सबलीकरणाचे वर्ष असे जाहीर केले स्त्री सक्षमीकरण या संकल्पनेचा विचार करत असता स्त्रियांच्या दृष्टीने सर्वच क्षेत्रांमध्ये समानता, समता, शिक्षण, आरोग्य न्याय मिळवून देणारा सक्षम समाज निर्माण करणे म्हणजे स्त्री सक्षमीकरणाच्या दृष्टीने योग्य पाऊल उचलणे होय. स्त्री सक्षम होऊन स्वत:चे निर्णय स्वत:घेऊ शकते.

**व्याख्या**

व्हिनेसा ग्रिफेनच्या मते " स्त्रियांच्या अंगी निर्णय घेण्याची नियंत्रण करण्याची, संघटन करण्याची क्षमता, मतप्रदर्शन करणे, कृतीशील कार्यक्रम घडवून आणणे, लोकसंपर्क आर्थिक व्यवहार, तिची आवड पूर्ण होणे, याला महिला सबलीकरण म्हणतात."

लता बाटलीवालांच्या मते-

"स्त्रीला सक्षम करणे ही एक प्रक्रिया आहे ही प्रक्रिया स्त्रिला इतर उपेक्षित घटकांना दूर ठेवण्याच्या सुव्यवस्थीत प्रवाहाचे स्वरूप बदलून व नवी दिशा देवून कृतीत आणता येते. तेव्हा प्रामुख्याने स्त्रिला सक्षम करण्यासाठी तिला शक्ती देण्याचे प्रयत्न केले गेले. तरच ती अधिक गतीने प्रगत होऊ शकते.''

**स्त्री सक्षमीकरण अर्थ व संकल्पना** : -

महिलांचे सक्षमीकरण ही संकल्पना सर्वप्रथम ब्राझीलचे शिक्षणतज्ञ पावलो फ्रिरे यांनी उपयोगात आणली. सबलीकरण म्हणजे शक्ती ही शक्ती सकारात्मक व नकारात्मक या दोन्ही बाजूंनी कार्य करीत असते. दुर्बल महिलांना सबल करणे आणि त्यांना समान हक्क व संधी देणे हेच यामागील तत्त्व आहे. महिलांचा सर्वक्षेत्रात विकास साधणे, महिलांच्या सक्षमीकरणात आर्थिक प्रगतीबरोबर सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक विकास होणे ही अभिप्रेत आहे.

प्रत्यक्ष जीवनात बहुसंख्य स्त्रिया अत्यंत कमी वेतन,कमी मजुरी, किमान कौशल्य,उत्पादनाच्या जगात कमीवाव, किमान साक्षतरा कुपोषण अनारोग्य आणि कुटूंबातील हिंसाचाराला बळी पडतात.

कुटुंबे,घरेदारे आणि भोवतीची समाजव्यवस्था यामध्ये खऱ्या अर्थाने विकेंद्रीकरण,लोकशाही मूल्यांची जोपासना व्हायची, तर भारतातील स्त्रियांना प्रौढ समजदार होण्यासाठी वाव निर्माण झाला पाहिजे असा सबलीकरणाच्या संकल्पनेचा आग्रह आहे. स्त्री सक्षमीकरण हे भारताच्या प्रगती व विकासाठी महत्वाचे आहे. परंतु भारतातील स्त्री सक्षमीकरणासमोर अनेक आव्हाने, व अडथळे आहेत. जे समाजात स्त्रियांना समानदर्जा व समान संधी देण्याच्या दृष्टीने अडथळा आणतात. लेखिका सानिया यांच्या 'स्थलांतर' कादंबरी अभ्यासाच्या दृष्टीकोनातून, या कादंबरीतील नायिका सामान्य जीवन जगत असता, त्यांच्या समोर अनेक आव्हाने व अडथळे आले आहेत. ही आव्हाने पार करत, आलेल्या अडथळ्यांवर मात करून नायिका स्वतः आत्मनिर्भर कशी बनते, समाजात स्वतः अस्तित्त्व निर्माण करून ती टिकवते.

सानिया यांची 'स्थलांतर' ही कादंबरी मनाला खूप भावनारी आहे. नात्यांकडे डोळसपणे बघण्यास प्रवृत्त करते. उच्च वर्गातील स्त्रीजीवनाचे चित्रण या कादंबरीतून पाहावयास मिळते.

**शोध निबंधाची उद्दिष्टे -**

१. स्त्री सशक्तीकरण ही संकल्पना स्पष्ट करणे.

२. स्थलांतर कादंबरीतील नायिकांच्या समोरील आव्हाने व अडथळे यांचा आढावा घेणे.

**शोध निबंधाची गृहितकृत्ये**

१. स्त्रीशिक्षण व विविध क्षेत्रात समान संधी याव्दारे स्त्री सशक्तीकरण होत आहे.

२. स्त्रियांसमोरील विविध क्षेत्रातील असणारे प्रश्न, समस्या स्त्री सशक्तीकरणासमोरील अडथळे ठरत आहेत.

३. स्त्रियांना समाजात पुरुषांप्रमाणे समान संधी, समान दर्जा, समाजात स्त्री-पुरुष समानता या तत्वावरच स्त्री सशक्तीकरण अवलंबून आहे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोध निबंधासाठी तथ्य संकलन करीत असताना दुय्यम तध्यसामुग्रीचा आधार घेण्यात आलेला आहे. त्यासाठी संदर्भग्रंथ, मासिके, इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या माहितीचा आधार घेवून शोधनिबंधाचे लेखन करण्यात आलेले आहे.

सानिया या मराठी साहित्यातील आघाडीच्या कथा, कादंबरी लेखिका. त्यांच्या साहित्यात स्वतः प्रती सजग होत जाणाऱ्या, विशेषतः उच्चवर्गातील स्त्रीजीवनाचे चित्रण येते. विषमतेवर आधारित पुरुषसत्ताक कुटुंबरचना आणि त्याविरुद्ध स्त्री स्वातंत्र्याचा विचार अधोरेखित करणाऱ्या स्त्रियांचे चित्रण त्यांच्या कादंबरीत दिसते. सानिया यांच्या 'स्थलांतर कादंबरीतील नायिकांच्या समोर अनेक अडथळे आले, अनेक आव्हाने समोर ठाकली. ती खालील प्रमाणे आहेत.

१) बहुपत्नीत्व प्रथा - या कादंबरीतील आप्पा या नायकाची पहिली पत्नी, नवऱ्याला ती आवडत नाही. म्हणून ते दुसरी बायको करतात नंतर कायमचं सासरं सोडून ती माहेरी राहायला जाते. पण माहेरी सगळे कामाला जुपतात आणि घालून पाडून बोलतात, आपण असण्याचं कोणालाच सोयर सुतक नसल्याने तिची झालेली कोंडी, जगण्याबद्दलची अनास्था व शेवटी तळयात पाय घसरून पडल्याचं निमित्त करुन तिने केलेली आत्महत्या हा स्त्री सशक्तीकरणातील अडथळा आहे .

२)स्व: अस्तित्वाचा शोध घेणे :

कादंबरीतील नायिका सावित्री. तिला लग्न करायचं नाही, कारण तिला खूप शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभं राहायचं आहे. पण कुटुंबातील सर्वजण जबरदस्ती लग्न ठरवतात. पण तरीही ती स्वतःचे अस्तित्त्व जपण्यासाठी भावा समोर अट ठेवते की शिक्षण अखंड सुरू राहत असेल तर मी लग्न करेन. अन्यथा हे लग्न मोडायची जबाबदारी तुझीच यासर्वांतून सावित्रीच्या मनात शिक्षणाविषयी असणारी तळमळ दिसते. याठिकाणी स्व: अस्तित्तव टिकवणे हे तिच्या समोरील मोठं आव्हान आहे.

3) अंतर्मुखी जीवन व्यतित करणे -

कादंबरीतील नायिका मीनाक्षी लग्नानंतर बरीचवर्षे गर्भधारणा होत नाही म्हणून ममतेच्या आशेपोटी जीवन जगत राहते अतिशय हताश व निराश होऊन आपल्या पती समोर दुःख व्यक्त करते आणि आपल्या पतीचे माझ्यावर प्रेमच नाही ते दुस-या स्त्रीवरती आहे, हे समजल्या नंतरही वैवाहीक जीवन जगत राहते. चारचौघांनी लग्न लावून दिलं म्हणून आपण एकत्र राहतो ही गोष्ट मीनाक्षीला अंतर्मुख करते. असे अंतर्मुख होऊन आयुष्य व्यतित करणे हे तिच्या समोरील आव्हान आहे.

४)कमावत्या स्त्रियाकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन-

नोकरी करणारी स्त्री म्हणजे कमावती स्त्री. घरातील आर्थिक स्थिती मजबूत करण्यास तिचा फार मोठा हातभार लागतो. परंतु कौटुंबिक जीवन व नोकरी सांभाळत असताना स्त्रियांची तारेवरची कसरत होते. त्यातून कौटुंबिक जीवनातील काही उणीवा राहिल्यास स्त्रिला दोष दिला जातो. परिणामी घरातील स्वास्थ. बिघडते, ताण-तणाव वाढतो. या कादंबरीतील नायिका, सावित्री आपले कुटुंबजीवन व नोकरी यांचा समन्वय कसा साधते व आपले अस्तित्व कसे टिकवून ठेवते यांचे चित्रण दिसते. कमावत्या स्त्री कडे ही कुटुंबातील महत्त्वाचा घटक मानून तिला समजून घेऊन, सहकार्य करणे खूप महत्त्वाचे आहे. तरच स्त्रीसक्षमीकरण योग्य पध्दतीने होईल. अन्यथा कमावत्या स्त्रीकडे पाहण्याचा आर्थिक स्त्रोत म्हणून समाजाचा दृष्टीकोन हा सर्वात मोठा अडथळा ठरेल.

५) लैंगिक अत्याचार :

समाजात प्राचीन काळापासून स्त्रियांकडे उपभोगाचं साधन म्हणून पाहिले जाते. त्यामुळे स्त्रियांना अनेक अत्याचारांना सहन करावे लागते. या कादंबरीतील नायिका नंदिता आपल्या पतीच्या अत्याचारांना सहन करीत, हे असं सगळं नैसर्गिक आहे असा विचार करत आपलीच काहीतरी चूक आहे ही अपराधीपणाची भावना बाळगते शंतनू हा तिचा पती नंदितामध्येच कमतरता आहे आणि ती पुरुषार्थाला जागवू शकत नाही, फुलवू शकती नाही. असा तिच्यावर आरोप करतो व आक्रमता दाखवून तिला मारहाण करतोः स्वतःचा पुरुषार्थ गाजवितो. याव्दारे प्रत्येक परिस्थितीत स्त्रियांनाच कारणीभूत मानून, दोषी ठरवून त्यांच्यावर अत्याचार करणे हे स्त्रियांसमोरील मोठे आव्हान आहे.

६)अंधश्रद्धा व गैरसमजूतींचा अवलंब :

सध्याचे बदलते आधुनिक युगामध्ये तंत्रज्ञानाने खूप प्रगती केली आहे. समाजाने अनेक बदल स्वीकारले आहेत. तरी अजूनही समाजात अंधश्रध्दा व गैरसमुजूतींचा अवलंब केला जातो. कांदबरीतील नायिका 'मीनाक्षी- गर्भधारणा होत नाही म्हणून व्रतवैकल्ये व पूजा, कर्म करून स्वतःच्या मनाला शांतता मिळवण्याचा प्रयत्न करत राहते. परंतु स्वतः शिक्षित असून

पती डॉक्टर असून,ही गर्भधारणेसाठी शारिरीक व मानसिक स्थिती मजबूत असणे महत्त्वाचे असते या सत्याकडे डोळे झाक करते. अंधश्रध्दा बाळगणे हा स्त्रीसक्षमीकरणातील सर्वांत मोठा अडथळा आहे.

७)विषमतेवर आधारित पुरुषसत्ताक कुटुंबरचना :

समाजात अजूनही विषमतेवर आधारित पुरुषसत्ताक कुटुंबरचना पहावयास मिळते. या कादंबरीतील नायक आप्पा स्वतःच्या हौसेपोटी, आपला प्रथम विवाह झालेला असूनही पूनर्विवाह करतो.कुटुंबातील सर्व अंतिम निर्णय आप्पाचेच असतात. अगदी मुलांच्या शिक्षण घेण्यापासून ते व्यवसाय निवड व विवाह जुळविणे. याबाबत स्त्रियांना आपले मत व्यक्त करण्यास कोठेही वाव दिलेला नाही. स्त्री-पुरुषामध्ये अजूनही असमानतेची दरी दिसून येते.

८)लिंग भेद:

आपण प्रगतशील होत असलो तरी अजूनही बऱ्याच ठिकाणी, मुलगा-मुलगी असा लिंग भेद दिसून येतो. या कादंबरीतील नायक आप्पा हे आपली पहिली पत्नीस मुलगा आहे व दुसऱ्या पत्नीस मुलगी झाली म्हणून तो पहिल्या पत्नीस घरी न आणता फक्त आपल्या मुलास जगदीश यास घरी घेऊन येतात. यामध्ये मुलगा म्हणजे वंशाचा दिवा हा दृष्टीकोन समोर ठेवून घेतलेला हा निर्णय दिसून येतो. त्यामूळे मुलगा-मुलगी लिंग भेद हा स्त्रीः सक्षमीकरणातील मोठा अडथळा आहे.

ज्याप्रमाणे पुरुष हा मानव प्राणी आहे. त्याचप्रमाणे स्त्री देखील एक मानव प्राणीच आहे. स्त्री ही पुरुषांपेक्षा वेगळीनसून, ती सुध्दा पुरुषांप्रमाणेच ठाम निर्णय घेण्यास सक्षम आहे हा विचार सर्वांच्या मनामध्ये रुजविणे गरजेचे आहे.

विशेषत: तरुण मुली आणि बालिका यांच्यासाठी भरीव प्रयत्न होणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे स्त्रिया कुटूंबात जेव्हा कर्त्या होतात, तेव्हा त्याचा चांगला परिणाम कुटुंबातील सकस आहार आणि आरोग्य यावर होतो, त्याप्रमाणे बालिका आणि तरुण मुली यांना निर्भय वाटेल. असे वातावरण प्रत्येक झोपडीत,वसाहतीमध्ये,अगदी एकीकडे निर्जन रस्त्यावर ही झाले पाहिजे. नाहीतर स्त्रियांच्या सक्षमीकरणाचे, सबलीकरणाचे सर्व प्रयत्न फोल ठरतील.

स्थलांतर या कादंबरीतील नायिकांच्या समोर वरील प्रमाणे अनेक आव्हाने व अडचणी निर्माण झाल्या परंतु या सर्वांवरती त्यांनी योग्य मार्ग काढून पुढे आयुष्याची वाटचाल केली. या कादंबरीतून लेखिका सानिया यांनी 'स्थलांतर' या कादंबरीतून नंदिता, मीनाक्षी, सावित्री, आम्मा, रिना अशा अनेक नायिका पात्रांद्वारे सामाजिक वास्तवाचे भान करून दिले आहे. या कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा सुशिक्षित, कमवत्या, स्वतःच्या अस्तित्त्वाचे भान असलेल्या, स्वातंत्र्यांची आस धरणाऱ्या आहेत. स्वतः प्रती सजग होत जाणारी स्त्री सानियांच्या कादंबऱ्यात विशेषत्वाने भेटते.

**निष्कर्ष:**

१. स्त्रीचे अस्तित्व, तिची महत्वाकांक्षा, तिचे व्यक्ती म्हणून जगणे, स्वतःच्या अस्तित्वाचा शोध घेणे या दृष्टीकोनातून एका कलात्मक पातळीवर 'सानिया' यांनी हे सारे चित्रण केले आहे.

२.स्त्रीच्या भूमिकेतून 'ती एक माणूस' म्हणून सहजपणे मांडली आहे.

३.सानिया यांनी स्थलांतर या कादंबरीतून संवेदनशीलता, स्त्रीप्रती सजगता, नातेसंबंधाची जपणूक स्पष्ट केली आहे.

४. स्त्रियां समोरील आव्हाने व अडथळे मांडून त्यातून कादंबरीतील नायिकांनी ही आव्हाने कशी समर्थपणे पेलली आहेत. हे दिसून येते.

अशा प्रकारे स्त्री सक्षमीकरण ही एक काळाची गरज बनली आहे. स्त्री-पुरुष ही विषमता नष्ट करून, मानव संसाधनातील स्त्री एक महत्वपूर्ण घटक असून त्यांचा विकास हा देशाचा विकास होण्यास किती आवश्यक आहे. हे लक्षात घ्यावे लागेल. स्त्रियांना त्यांच्या स्वत्वाची, हक्क, अधिकाराची जाणीव होणे गरजेचे आहे. त्यासाठी 'स्त्रीशिक्षण' ही काळाची गरज आहे. समाजाच्या विविध क्षेत्रात स्त्रियांना समान संधी, समान दर्जा मिळाला पाहिजे. त्यांना सामाजिक. आर्थिक, राजकीय, मानसिक स्वातंत्र्य मिळाले, तरच स्त्री सशक्तीकरण यशस्वी होईल. शासकीय पातळीवरुन सर्वच स्तरातून स्त्रियांच्या विकासाबाबात अनेक प्रयत्न केले जात असले तरी समाजातील सर्वच घटकांनी स्त्री सशक्तीकरणास योग्य प्रतिसाद दिला पाहिजे.

**संदर्भ सूची :**

१. सानिया- स्थलांतर (मौज प्रकाशन गृह - २०१४)

२. डॉ. लीला पाटील भारतीय स्त्रीजीवन

(मेहता पब्लिशींग हाऊस, पुणे)

३. अभिसरण मासिक (ऑक्टोंबर २०१०)

४. मराठी विश्वकोश.. https://marathi vishwakosh.org/307261

५. डॉ.विलास आढाव – महिला सबलीकरण (पुणे विद्यापीठ)